पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांचेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या मोडी लिपी प्रशिक्षण वर्गास कायम स्वरुपी मंजूरी देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : मपुवि २०२०/प्र.क्र.०५/सां.का.२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२०.

वाचा: १. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक : मपुवि-२००७/प्र.क्र.४३/सां.का.२, दि.१४.५.२००८.
२. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक : मपुवि-२०१४/प्र.क्र.२००/सां.का.२, दि.१८.५.२०१५.
३. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक : शासन निर्णय क्रमांक : मपुवि २०१८/प्र.क्र.४९/सां.का.२,दि.१०जूलै,२०१८.
४. संचालक, पुराभिलेख संचालनलाय पत्र क्र.टीआरएन-५०१९/३२८४, दि.६.९.२०१९.

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यातील शासकीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात मोडी लिपीतील महत्वाचे अभिलेख आहेत. सदर अभिलेख वाचण्यासाठी वाचक निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच भारतीय ऐतिहासिक कागदपत्र आयोग, नवी दिल्ली यांच्या ४६ व्या अधिवेशनातील ठराव क्रमांक ७ नुसार पुराभिलेख संचालनालयामार्फत मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग योजना कायमस्वरुपी राबविण्यास या विभागाच्या संदर्भ १ येथील दि.१४ मे २००८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली. संदर्भ क्र. २ येथील दि. १८ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक आर्थिक वर्षात जास्तीत जास्त ६ प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्याचा तसेच या प्रत्येक मोडी लिपी प्रशिक्षण शिबीरासाठी रु.३०,०००/- पर्यंत खर्च करण्याचा निर्णय घेण्यात आला. संदर्भ क्र. ३ येथील दि.१० जूलै, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक आर्थिक वर्षात जास्तीत जास्त ६ प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्याचा तसेच या प्रत्येक मोडी लिपी प्रशिक्षण शिबीरासाठी रु.४०,०००/- पर्यंत खर्च करण्याचा निर्णय घेण्यात आला. मोडी लिपी प्रशिक्षण वर्गांची संख्या, खर्च मर्यादा व प्रवेश शुल्क वाढविण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

आता या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधिनतेने पुराभिलेख संचालनालयास मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग योजना कायमस्वरुपी राबविण्यास मान्यता देत आहे :-

१. एका आर्थिक वर्षात प्रत्येक महसूली विभागात एक याप्रमाणे एकूण ६ मोडीलिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावेत.

२. प्रत्येक मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचा खर्च कमाल रु.५०,०००/- इतक्या रकमेच्या मर्यादेत असावा.

३. मोडी लिपी प्रशिक्षण वर्गासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रवेश शुल्क रू.३००/- व अन्य व्यक्तींसाठी प्रवेश शुल्क रू. ६००/- आकारण्यात यावे.शुल्काची रक्कम संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

२. याबाबतचा खर्च "मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला आणि संस्कृती (००) १०४, पुराभिलेख (०१) (०२) पुराभिलेख कार्यालये (२२०५ १७९५) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली त्या त्या वित्तीय वर्षात उपलब्ध करण्यात आलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ISSUED

(अनिस शेख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई.
२. महालेखापाल,महाराष्ट्र-१(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अवर सचिव (अर्थसंकल्प) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. निवड नस्ती-सां.का.२